तरूण भारत

# विद्यापीठाकडून लाभलेले सहकार्य अविस्मरणीय

प्रतिनिधी
कोल्हापूर

▪ परदेशी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात भावना

शिवाजी विद्यापीठ परिवारातील विविध घटकांसह कोल्हापूरकरांकडून लाभलेले प्रेम व सहकार्य अविस्मरणीय आहे, अशा भावना विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतून पदवी, पदव्युत्तर, पीएच. डी. पूर्ण केलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांत केंद्रीय परराष्ट्र विभागाच्या इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स स्कॉलरशीप स्कीम अंतर्गत शिक्षण घेत होते. शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. ‍अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती होती.

आंतरराष्ट्रीय कक्षाचे डॉ. अनिल घुले, वसतीगृह अधीक्षक डॉ. जे. बी. यादव यांच्याबद्दल विद्यार्थ्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. जी.एस. राशीनकर यांनी नोंदणीची कार्यवाही केली. डॉ. ए. व्ही. घुले यांनी प्रास्ताविक केले. जे. बी. यादव यांनी आभार मानले. जी. आर. पळसे, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. के. डी. सोनावणे, डॉ. व्ही. वाय. धुपधाळे उपस्थित होते.

२०१७-१८ मध्ये मानसशास्त्रात पीएच.डी.साठी वर्धा बाहमन मोखलेसी यांनी प्रवेश घेतला होता. विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त करणारे ते पहिले परदेशी विद्यार्थी ठरले. त्यांच्यासह २० विद्यार्थ्यांनी विद्यापीठातून पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे.